# रवळनाथ सोसायटीच्या कर्मचाऱ्यांना विमा कवच

सकाळ वृत्तसेवा

गडहिंग्लज, ता. १९ : येथील श्री. रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे सर्व कर्मचाऱ्यांना विमा कवच देण्यात आले. कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर संस्थेने आपल्या कर्मचाऱ्यांची काळजी घेतली आहे. संस्थेच्या विविध शाखांतील सर्व १०४ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी सात लाखांचे विमा संरक्षण मिळाले आहे.

कोरोनाच्या संकटात कर्मचाऱ्यांना सरंक्षण मिळणे आवश्यक होते. ही बाब लक्षात घेऊन रवळनाथ सोसायटीने कर्मचाऱ्यांसाठी नॅशनल इन्शुरन्स कंपनीकडून दोन लाखाचे कोरोना विमा कवच, तर एलआयसीकडून पाच लाखांचा नैसर्गिक, अपघाती विमा काढला आहे. त्याचा लाभ संस्थेच्या मुख्य कार्यालयासह आजरा, गडहिंग्लज, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगाव, निपाणी व कुडाळ शाखेत कार्यरत असणाऱ्या १०४ कर्मचाऱ्यांना होणार आहे. कोरोनाचा संसर्ग झाला तरी वैद्यकीय उपचारासाठी व जीवन विमा संरक्षण, असे दुहेरी पाठबळ मिळणार असल्याची माहिती रवळनाथ सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

पुढारी

# 'रवळनाथ'कडून कर्मचाऱ्यांना सात लाखांचे विमाकवच

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

श्री रवळनाथ को-ऑप. हाऊसिंग फायनान्स सोसायटीने आपल्या संस्थेतील सर्व कर्मचारी वर्गाला सात लाख रुपयांचे विमाकवच दिले.

कोरोनाच्या काळात संस्थेने कर्मचारी यांना विम्याचे सहाय्य उपलब्ध व्हावे, या उद्देशाने दोन लाखांचे विमाकवच व पाच लाखाचे नैसर्गिक किंवा अपघाती मृत्यूबाबतचे संरक्षण उपलब्ध करून देण्यात आले, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली. विमा संरक्षणामुळे कर्मचारी वर्गास कोरोना कालावधीत कोरोना संसर्गानंतर वैद्यकीय उपचारासाठी व जीवन विमा संरक्षण असे दुहेरी संस्थेचे पाठबळ मिळाले आहे. मुख्य कार्यालयासह आजरा, गडहिंग्लज, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगाव, निपाणी, कुडाळ शाखेतील १०४ कर्मचाऱ्यांना लाभ होणार आहे.

---

## -बेटी पढाओ' मोहीम

केलेल्या मातांसह तीन मुलींना दत्तक घेतलेल्या विद्या सूर्यवंशी, कोरोना योद्धा स्वाती दळवी यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. अश्विनी शिंदे यांनी स्त्री-भ्रूणहत्या या विषयावर मार्गदर्शन केले. रांगोळी, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. मुलींनी नाटिका सादर केली फॅन्सी ड्रेस स्पर्धेतन

My Kolhapur Edition
Oct 20, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# रवळनाथ सोसायटीच्या कर्मचाऱ्यांना सात लाखांचे विमा कवच

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. १९ : येथील श्री. रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे सर्व कर्मचाऱ्यांना विमा कवच देण्यात आले. कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर संस्थेने आपल्या कर्मचाऱ्यांची काळजी घेतली आहे. संस्थेच्या विविध शाखांतील सर्व १०४ कर्मचाऱ्यांना प्रत्येकी सात लाखाचे विमा संरक्षण मिळाले आहे.

कोरोनाच्या संकटात कर्मचाऱ्यांना सरंक्षण मिळणे आवश्यक होते. ही बाब लक्षात घेऊन रवळनाथ सोसायटीने कर्मचाऱ्यांसाठी नॅशनल इन्शुरन्स कंपनीकडून दोन लाखाचे कोरोना विमा कवच, तर एलआयसीकडून पाच लाखांचा नैसर्गिक, अपघाती विमा काढला आहे. त्याचा लाभ संस्थेच्या मुख्य कार्यालयासह आजरा, गडहिंग्लज, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगाव, निपाणी व कुडाळ शाखेत कार्यरत असणाऱ्या १०४ कर्मचाऱ्यांना होणार आहे. कोरोनाचा संसर्ग झाला तरी वैद्यकीय उपचारासाठी व जीवन विमा संरक्षण, असे दुहेरी पाठबळ मिळणार असल्याची माहिती रवळनाथ सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.